क्रमांक : ९२५८ /ड-३ (समिती समन्वय)
महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय,
विधान भवन, मुंबई.
दिनांक : ५ मे, २०२२.

## : : प रि प त्र क : :

संदर्भ : (१) या कार्यालयाचे परिपत्रक क्र.७९३/ड-३ दिनांक १४ जानेवारी, २०२२.
(२) या कार्यालयाचे परिपत्रक क्र.२९०८/ड-३ दिनांक २१ फेब्रुवारी, २०२२.
(३) या कार्यालयाचे परिपत्रक क्र.५२७७/ड-३ दिनांक १४ मार्च, २०२२.
(४) या कार्यालयाचे परिपत्रक क्र.८३६७/ड-३ दिनांक २१ एप्रिल, २०२२.
(५) या कार्यालयाचे परिपत्रक क्र.९२५९/ड-३ दिनांक २ मे, २०२२.

मा.पीठासीन अधिकारी यांच्या दिनांक ४ मे, २०२२ रोजी विधीमंडळ समित्यांच्या दौऱ्यासंदर्भातील झालेल्या बैठकीत घेण्यात आलेल्या निर्णयानुसार समित्यांच्या दौऱ्यांबाबत यापूर्वीचे सर्व आदेश अधिक्रमित करुन पुढीलप्रमाणे मार्गदर्शक तत्वांचे पालन करण्याबाबत सर्व कक्षांना सूचित करण्यात येत आहे.

१) मा.पीठासीन अधिकारी यांच्याकडे ३ महिन्यांचा समितीच्या दौऱ्याचा कार्यक्रम मान्यतेसाठी सादर करणे आवश्यक आहे. तसेच विधीमंडळाच्या समितीने कोणत्याही जिल्ह्याच्या दौऱ्यावर जाण्यापूर्वी संबंधित कक्षाने कमीत-कमी ३ महिने अगोदर संबंधित जिल्ह्याच्या प्रशासकीय यंत्रणेला व विभागांना अवगत करणे आवश्यक आहे.

२) मा.पीठासीन अधिकारी यांची दौऱ्यासंदर्भात अनुमती घेताना त्यामध्ये दौऱ्याची संक्षिप्त व वस्तुस्थितीदर्शक कारणमिमांसा संबंधित कक्षाने त्यासंदर्भातील प्राप्त आधारसामुग्रीसह मा.पीठासीन अधिकारी यांच्या अवलोकनार्थ सादर करावी.

३) सर्व समित्यांचे असे कार्यक्रम प्राप्त झाल्यावर "ड-३" (समन्वय) कक्ष एकत्रित स्वरुपात सदर कार्यक्रम प्रत्येक महिन्यात मा.पीठासीन अधिकारी यांच्या मान्यतेसाठी सादर करेल.

४) विधीमंडळाची एखादी समिती एका महिन्यात एखाद्या जिल्ह्यात दौऱ्यावर गेली असल्यास वा जाणार असल्यास, दुसरी समिती त्याच महिन्याच्या कालावधीत त्या जिल्ह्याच्या दौऱ्यावर जाणार नाही.

५) एका समितीने एका महिन्यात दोन जिल्ह्यांमध्ये दौरा आयोजित करु नये.

..२/-

६) या मार्गदर्शक तत्वांमध्ये ज्या बाबींसंदर्भात विशिष्ट आदेश नाहीत, त्यासंदर्भात महाराष्ट्र विधानसभा नियमातील नियम १७६ तसेच नियम १९० मधील तसेच महाराष्ट्र विधानपरिषद नियमातील नियम, १७१ व १८३ यामधील तरतुदींच्या अधिनतेने एखाद्या समितीला एखाद्या जिल्ह्यात दौरा करण्यास अनुमती देणे, किंवा त्यात बदल करणे वा अनुमती नाकारणे याबाबत मा.पीठासीन अधिकारी यांचा निर्णय अंतिम असेल.

७) या परिपत्रकाच्या दिनांकापूर्वी नियोजित दौऱ्यांच्या संदर्भात, या परिपत्रकातील कार्यपध्दती आवश्यक त्या फेरफारांसह लागू होईल.

मा.पीठासीन अधिकारी यांनी समितीच्या दौऱ्यांबाबत दिलेल्या वरील मार्गदर्शक तत्वांचे समिती कक्षांनी दौरे आयोजित करताना पालन करणे आवश्यक आहे.

( राजेन्द्र भागवत )
प्रधान सचिव,
महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय.

**याची प्रत :**

१) सर्व समित्यांचे मा.समिती प्रमुख व मा.सदस्य.

२) या सचिवालयातील सर्व अधिकारी व सर्व कक्ष.

**प्रतिलिपी :**

१) मा.सभापती, महाराष्ट्र विधानपरिषद यांचे सचिव.

२) मा. उप सभापती, महाराष्ट्र विधानपरिषद व मा.उपाध्यक्ष, महाराष्ट्र विधानसभा यांचे खाजगी सचिव तथा जनसंपर्क अधिकारी.

३) मा.विरोधी पक्ष नेते (विधानपरिषद/विधानसभा) यांचे खाजगी सचिव तथा जनसंपर्क अधिकारी.